सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## आपत्ती व्यवस्थापन शाखा

दुरध्वनी क्र.020-26123371
E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

*****************************************************************************

क्र.कक्ष/आ.व्य.प्र./1488/2020
पुणे दिनांक :-07/06/2020.

**विषय :- निसर्ग चक्रीवादळामुळे झालेले नुकसानीचे मदत वाटपाबावत...**

## आदेश

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी,**सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यात निसर्ग चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झालेली आहे. तसेच शेतीपिके, पॉलीहाऊस व शेडनेट यांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे बाधित नागरीक व शेतकरी यांना शासन निर्णयाप्रमाणे देय मदतीचे वाटप तालुकास्तरावर सुरू आहे. शासन निर्णयाप्रमाणे देय मदतीची रक्कम तहसिल कार्यालयामार्फत नागरीक व शेतकरी यांच्या आपल्या बँकेतील खात्यावर चेक व आर.टी.जी.एस.व्दारे जमा करणेत येत आहे. परंतू नैसर्गिक आपत्तीमुळे मदत म्हणून दिलेली रक्कम नागरीक व शेतकरी यांच्या खात्यावरून परस्पर त्यांच्या कर्ज खाते व इतर खाती यामध्ये समायोजीत किंवा कपात करण्यात येऊ नये, अशा सुचना देणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी पुणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये सर्व राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांना आदेशीत करणेत येते की, नैसर्गिक आपत्तीमुळे मदत म्हणुन देय रक्कम नागरीक व शेतकऱ्यांच्या अन्य कर्ज खाती व इतर खाती यांच्यामध्ये परस्पर समायोजित किंवा कपात करणेत येऊ नये. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये कायदेशीर कारवाई करणेत येईल.

जिल्हाधिकारी
पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१) आग्रणी बँक मॅनेजर, पुणे
२) व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे
३) व्यवस्थापक, सर्व राष्ट्रीयकृत/खाजगी बँक, पुणे

प्रत :-

१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
२) मा.पोलीस आयुक्त, पुणेशहर व पिंपरी-चिंचवड
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पुणे
४) पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण
५) उपविभागीय अधिकारी सर्व
६) तहसिलदार सर्व
७) गटविकास अधिकारी सर्व
८) तालुका कृषि अधिकारी सर्व

Scanned with CamScanner